# महाराष्ट्र शासन

E-mail id : sd4.sesd-mh@gov.in

क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२०१/एसडी-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ०४ ऑक्टोंबर,२०२२.

प्रति,

१) आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य,पुणे,

२) संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,
पुणे,

३) शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य,पुणे,

४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**विषय** :- राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम तसेच कोटपा-२००३ च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०९.२०२२ रोजी राज्यस्तरीय समन्वय समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०९.२०२२ रोजी राज्यस्तरीय समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मुख्य सचिव महोदयांनी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) दिनांक १० फेब्रूवारी,२०२१ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ९ मुद्यांची माहिती शाळास्तरावर सविस्तर भरता यावी यासाठी राज्यातील सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करावे.

२) या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी तंबाखू ने होणारे दुष्परिणाम व त्यांच्या वापरावर आळा कसा घालता येईल या विषयी माहिती द्यावी.

३) सर्व विभागीय उपसंचालक यांनी आपल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्था तंबाखूमुक्त झाल्या किंवा नाही/ जर झाल्या नसतील तर सदर धोरण अभियान स्वरूपात राबवून पुढील २ महिन्याच्या कालावधीत सर्व संस्था तंबाखूमुक्त कराव्यात. या धोरणात उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या शिक्षणाधिकारी,गटशिक्षणाधिकारी,मुख्याध्यापक यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात या विषयी घेतलेल्या प्रयत्नांना विशेष उल्लेख करून गुणांकन केले जावे.

४) राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी,गट शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांनी पुढाकाराने तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था धोरणात सहभागी होऊन राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था तंबाखूमुक्त कराव्यात.

२. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम तसेच कोटपा-२००३ ची योग्यरित्या अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती..

आपली,

( मृणाली काटेंगे )

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.